**क्रमांक १३**

**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग दोन**

**सोमवार, दिनांक ०३ मार्च, २०२५ / फाल्गुन १२, १९४६ शके**

**१३. मा.राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावाला सुधारणा :**

'विधानसभेच्या सर्व सन्माननीय सदस्यांना निदेशानुसार कळविण्यात येते की, मा.राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चा मंगळवार, दिनांक ०४ मार्च व बुधवार, दिनांक ०५ मार्च,२०२५ रोजी घेण्यात येणार आहे. मा. राज्यपालांच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास एका सदस्यास दहापेक्षा अधिक सुधारणा देता येत नाहीत अशी तरतूद म.वि.स. नियम ६१ मध्ये करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन सर्व विधानसभा सदस्यांना असे कळविण्यात येते की, **ज्या सदस्यांना आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास सुधारणा द्यावयाच्या असतील त्यांनी सुधारणांच्या सूचना कटाक्षाने Soft copy मध्ये a1.assembly.mls@gmail.com या ई-मेलवर (DVOT-Surekh या Font मध्ये) आज सोमवार, दिनांक ०३ मार्च, २०२५ रोजी सायंकाळी ०६:१५ वाजेपर्यंत पाठवाव्यात. विहित वेळेत प्राप्त न झालेल्या किंवा ऑफलाईन पध्दतीने प्राप्त होणा-या सूचना कार्यवाहीतून वगळण्यात येतील. सर्व विधानसभा सदस्यांकरिता मा.राज्यपालांच्या दिनांक ०३ मार्च, २०२५ रोजीच्या अभिभाषणाची प्रत (मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील) या सचिवालयाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली असून आभार प्रदर्शक प्रस्तावास सदस्यांकडून देण्यात येणाऱ्या सुधारणांच्या पुस्तिकेचे वितरण सन्माननीय सदस्यांना त्यांच्यासाठी राखीव असलेल्या टपालखणांद्वारे वितरीत करण्यात येईल.**

**विधान भवन,**
**मुंबई.**
**दिनांक : ०३ मार्च,२०२५**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार)**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :-**

(1)महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सदस्य

(2) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये

(3) संगणक कक्ष (Website)